# दिव्यांग बांधवांना मोफत सायकलींचे वितरण



**नवीन नाशिक (भ्रमर प्रतिनिधी) :–** सार्वजनिक शिवजयंती उत्सव समिती नविन नाशिक यांच्या वतीने आ. सीमा हिरे यांच्या मार्गदर्शनाखाली एक अद्भूत आणि समाजोपयोगी उपक्रम राबविण्यात आला.

शिवजयंती उत्सवाचे औचित्य साधून समितीमार्फत दिव्यांग बांधवांना मोफत सायकलींचे वितरण करण्यात आले. या वितरण सोहळ्याला भाजपा जेष्ठ नेते महेश हिरे यांची प्रमुख उपस्थिती लाभली. त्यांच्या हस्ते तसेच समितीच्या पदाधिकारी व सदस्यांच्या उपस्थितीत सायकलींचे वितरण करण्यात आले.

यावेळी मार्गदर्शन करताना महेश हिरे यांनी सांगितले की, शिवजयंती उत्सव साजरा करताना कुठेही बॅनर न लावता, डीजे न वाजवता समाजोपयोगी आणि विधायक उपक्रम राबविणे हीच खरी शिवभक्ती आहे. त्यांच्या या विचारांना उपस्थितांनी उत्स्फूर्त प्रतिसाद दिला. समाजातील गरजू आणि दिव्यांग बांधवांसाठी राबविण्यात आलेला हा उपक्रम निश्चितच प्रेरणादायी असून, शिवजयंती उत्सव साजरा करण्याचा एक आदर्श नमुना ठरला आहे. अशा उपक्रमांमुळे समाजात सकारात्मक संदेश जात असून, सामाजिक बांधिलकी जपण्याचे उत्तम उदाहरण समितीने घालून दिले आहे.

याप्रसंगी समिती अध्यक्ष मोनिका वराडे, अध्यक्ष सुबोध नागपुरे, नगरसेवक भूषण राणे, अंकुश वराडे, धनंजय देशमुख, मुकेश शेवाळे, मयूर मोरे, सुशील नाईक आदी उपस्थित होते.

# गोदावरी परिसरात निरंकारी सेवकांची स्वच्छता मोहीम

**नाशिक (भ्रमर प्रतिनिधी) :–** निरंकारी सेवकांकडून गोदावरी नदी परिसरात स्वच्छता मोहीम राबविण्यात आली. या अभियानांतर्गत स्वच्छ जल, स्वच्छ मन' या अभियानाच्या चौथ्या टप्प्याचा शुभारंभ महापौर हिमगौरी आडके यांच्या हस्ते करण्यात आला. या अभियानात जवळपास ५०० हून अधिक सेवक सहभागी झाले होते.

हे अभियान सद्‌गुरू माता सुदीक्षाजी महाराज आणि निरंकारी राजपिता रमितजी यांच्या मार्गदर्शनाखाली देशातील २५ राज्ये व केंद्रशासित प्रदेशांतील ९३० शहरांमधील १६०० हून अधिक ठिकाणी यशस्वीरीत्या पार पडले. सुमारे १२ लाख स्वयंसेवकांनी यात सहभाग नोंदविला होता. हा उपक्रम केवळ पर्यावरणीय प्रयत्न नव्हता; तर अध्यात्म, सेवा आणि सामाजिक बांधिलकी यांचा सुंदर संगम होता.

संत निरंकारी मिशनच्या सामाजिक शाखा संत निरंकारी चॅरिटेबल फाउंडेशन यांच्या पुढाकाराने बाबा हरदेवसिंह महाराज यांच्या शिकवणुकीतून प्रेरणा घेत 'प्रोजेक्ट अमृत' हा उपक्रम राबविण्यात आला. गोदावरी नदीपात्र स्वच्छतेसाठी निरंकारी मिशनचे सुमारे पाचशे सेवादल स्वयंस्फूर्तीने सहभागी झाले होते. तीन तासांत सेवकांनी व्हिक्टोरिया पूल व परिसर चकाचक केल्याने महापौर आडके यांनीही या अभियानाचे कौतुक केले. यावेळी मनपा स्वच्छता निरिक्षक संजय दराडे व मान्यवर उपस्थित होते. उपस्थितांचे सेक्टर संयोजक गुलाब पंजवाणी यांनी स्वागत केले. यावेळी सत्संगात विविध भक्तीगीते व एकत्वाच्या विचारांनी अभियानाचा समारोप करण्यात आला.



# नाशिकमध्ये बांधकाम कामगारांचा एल्गार



**नाशिक (भ्रमर प्रतिनिधी) :–** महाराष्ट्र राज्य इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळाच्या नाशिक जिल्ह्यातील 'मनमानी' कारभाराविरोधात कामगारांनी आता आरपारची लढाई पुकारली आहे. प्रशासकीय अनास्था आणि भ्रष्टाचारामुळे हक्काच्या लाभांपासून वंचित राहिलेल्या शेकडो कामगारांनी काल नाशिक विभाग बांधकाम कामगार हक्क कृती समितीच्या नेतृत्वाखाली विभागीय कामगार आयुक्त कार्यालयावर धरणे आंदोलन करण्यात आले.

'ऑल इंडिया कन्स्ट्रक्शन वर्कर्स फेडरेशन' (एआयटीयुसी) च्या देशव्यापी आंदोलनाचा भाग म्हणून नाशिकमध्ये हे शक्तिप्रदर्शन करण्यात आले. प्रशासकीय भ्रष्टाचारावर यावेळी घोषणा देण्यात आल्या. 'हिंद लॅब' आरोग्य तपासणी दरम्यान कामगारांना मिळणारा हक्काचा अल्पोपहार दिला जात नसल्याचा आरोप करण्यात आला आहे. गृहोपयोगी वस्तूंचे वाटप राजकीय व्यक्ती किंवा दलालांमार्फत होत असल्याने गरजू कामगार वंचित राहत आहेत. कामगारांच्या जीवाशी खेळ खेळणारे निकृष्ट दर्जाचे सुरक्षा किट वाटप थांबवून पारदर्शकता आणण्याची मागणी करण्यात आली. यावेळी १८ मागण्यांचे निवेदन कृती समितीने प्रशासनाला सादर केले.

या आंदोलनाला विविध संघटनांनी पाठिंबा दर्शवला. यात घंटागाडी कामगार नेते महादेव खुडे, ग्रामपंचायत कर्मचारी संघटनेचे सखाराम दुर्गुडे आणि भाकप जिल्हा सचिव मनोहर पगारे यांनी प्रत्यक्ष सहभाग नोंदवून प्रशासनाचा निषेध केला. प्रशासनाने येत्या ७ कार्यालयीन दिवसांत १८ मुद्यांवर लेखी आश्वासन दिले नाही, तर हे आंदोलन अधिक तीव्र होईल. आम्ही 'कामगार आक्रोश बेमुदत धरणे आंदोलन' छेडण्यास मागे-पुढे पाहणार नाही, असे आयटकचे जिल्हा सचिव भिमा पाटील, परिवर्तन कामगार सेनेचे विशाल भदर्गे, स्वामी असोसिएटचे प्रमोद जांगडा यांनी सांगितले.

# सगुणा फाऊंडेशन ग्रुपतर्फे शिवजन्मोत्सव साजरा



**नाशिक (भ्रमर प्रतिनिधी) :–** छत्रपती शिवाजी महाराज यांची शिवजन्मोत्सव दिनानिमित्ताने सगुणा फाऊंडेशन ग्रुपच्या वतीने शशिकांत उपासनी व ॲड. पी. डी. काळे यांनी छत्रपती शिवाजी महाराज यांच्या प्रतिमेस पुष्पहार व पुष्प अर्पण करून अभिवादन करण्यात आले. याप्रसंगी संस्थेचे अध्यक्ष राजेश गांगुर्डे यांनी नवनिर्वाचित नगरसेवक राहुल दिवे, प्रथमेश गिते, सीमा पवार, सचिन मराठे, आशा तडवी, ज्योती जोधंळे, कमलेश बोडके याचा सत्कार करण्यात आला. या कार्यक्रमाप्रसंगी प्रमुख पाहुणे म्हणून श्रीपाद कुलकर्णी, पी. डी. शिलेदार, कुणाल गायकवाड, बाळासाहेब जानमाळी , रमेश साळवे, डॉक्टर सुभाष काळे, दिनकर दाणी, प्रकाश मामा सोनवणे, गजुभाऊ घोडके, संजय मंडलिक, हिरामण काठे,ॲड. संजय खरे, संदीप डोळस, योगेश नन्नवरे, वंदना नागवंशी, भारती शेलार, लता वाघ, भारती पाटील, सुरेखा वाघ, भालचंद्र जाधव, अशोक जोशी, संजय देवरे, रविंद्र सोनोने, जयराम वाघ, विशाल पवार, संजय वानखेडे, नितीन काळे, संजय तेजाळे, आशिष चौरसिया, आबांदास बोराडे, शाम उपासनी, रविंद्र कुलकर्णी, बोरसे, बिहाडे, बाळु सोनवणे, भुषण महाजन आदी उपस्थित होते. संस्थेचे सेक्रेटरी दीपक कटारे, विजय अहिरे यांनी आभार व्यक्त करून राजाभाऊ शेळके, सुधीर गायकवाड, लभिब मुल्ला, अरुण शहाकर, सुशील बर्वे, नाना तेजाळे, प्रवज्ञा गांगुर्डे, मनिषा काळे यांनी कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी परिश्रम घेतले.

# वंजारी वधू-वर सूचक मेळावा रविवारी

**नाशिक (भ्रमर प्रतिनिधी) :–** विश्वश्री के. के. सानप फाउंडेशन यांच्या वतीने वंजारी वधू-वर सूचक भव्य राज्यस्तरीय मेळाव्याचे आयोजन रविवारी (दि. १) सकाळी १० वाजता नाशिक-पुणे रोडवरील बोधले नगर येथील श्री कृष्ण बँक्वेट हॉल येथे करण्यात आले आहे.

संपूर्ण वंजारी समाजातील बंधू-भगिनींना आपल्या नातेवाईकांतील विवाहयोग्य मुला-मुलींचे विवाह जुळविण्यासाठी या मेळाव्यात सहकार्य केले जाणार आहे. ज्यांच्याकडे लग्नासाठी मुलगा किंवा मुलगी असेल त्यांनी मेळाव्यास उपस्थित रहावे, असे आवाहन करण्यात आले आहे.

वधू-वर नाव नोंदणी फॉर्म मेळाव्याच्या दिवशी सकाळी १० वाजता हॉलवर उपलब्ध राहील. नोंदणीसाठी वधू-वर यांचा पासपोर्ट साईज फोटो सोबत आणणे आवश्यक आहे. मेळाव्यास येताना वधू-वर यांना प्रत्यक्ष सोबत आणावे, जेणेकरून पसंती झाल्यास मेळाव्यातच विवाह निश्चित होऊ शकेल. नाव नोंदणी फॉर्ममध्ये आवश्यक सर्व माहिती वधू-वर किंवा त्यांच्या पालकांकडून घेतली जाईल. मेळाव्याचा मुख्य उद्देश वधू-वर परिचय हाच आहे. कार्यक्रमाचे अध्यक्ष निवृत्त पोलीस उपअधीक्षक रावसाहेब पोटे असून मार्गदर्शक म्हणून प्रभाकर धात्रक आहे. नाव नोंदणी फॉर्म निरीक्षक सुधीर दराडे, सूत्रसंचालन अनिल सानप, रामदास बोधले हे करणार आहे. इच्छुकांनी मेळाव्याचा लाभ घ्यावा, असे आवाहन आयोजक विश्वश्री के. के. सानप फाउंडेशनतर्फे (मो. नं. ९८५०२२७४२७) करण्यात आले आहे.

# 'गोदा संवाद' वारसा फेरीला उत्स्फूर्त प्रतिसाद



**नाशिक (भ्रमर प्रतिनिधी) :–** इरा सेंटर फॉर इंडिक स्टडीजतर्फे आयोजित 'गोदा संवाद' या नि:शुल्क वारसा फेरीचे दहावे सत्र पार पडले. 'संत-सत्पुरुष आणि संजीवन समाधी विशेष' या विषयावर आधारित या पदभ्रमंतीला नाशिककरांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला.

या निमित्ताने गोदावरीच्या दोन्ही तीरांवरील विविध संत-सत्पुरुषांच्या समाधी स्थळांना भेट देत त्यांच्या कार्याचा आणि आध्यात्मिक परंपरेचा परिचय करून देण्यात आला.

एकमुखी दत्त मंदिर परिसरातील अद्वैतेश्वर रघुनाथ भटजी महाराज समाधीपासून फेरीची सुरुवात झाली. त्यानंतर यशवंतराव महाराज देव मामलेदार मंदिर, कपालेश्वर मंदिरासमोरील अजगरेश्वर महाराज समाधी, मुठे राममंदिर परिसरातील समाधी स्थळे,तसेच हुंडीवाला लेन येथील चैतन्यनाथ महाराज समाधी यांना भेट देण्यात आली. या फेरीत ज्येष्ठ अभ्यासक देवेंद्र पंड्या यांनी नाशिकच्या आध्यात्मिक परंपरेतील त्यांचे योगदान याविषयी सविस्तर माहिती दिली. 'इरा'च्या वतीने अनिता जोशी, विनय जोशी, डॉ. स्नेहल दंताळे, अनिकेत गाढवे आणि प्रसाद गर्भे यांनी फेरीचे नियोजन केले.

# सातपूर पोलिसांचा अवैधरित्या एलपीजी गॅस भरणाऱ्यांवर छापा

**सातपूर (भ्रमर प्रतिनिधी):–** श्रमिकनगर परिसरातील पार्थ पॅलेस हॉटेलजवळील मोकळ्या भूखंडावर ग्रीन शेड उभारून घरगुती वापरासाठी असलेला एलपीजी गॅस खासगी वाहनांमध्ये अवैधरित्या भरला जात असल्याचा धक्कादायक प्रकार उघडकीस आला आहे.

या प्रकरणी सातपूर पोलिसांनी काल दुपारी सुमारे एक वाजेच्या सुमारास धाड टाकून सहा गॅस सिलिंडर, पाईप, वजन काटे, इलेक्ट्रिकल मशीन व इतर साहित्य असा एकूण सुमारे ५० हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त केला.

मिळालेल्या माहितीनुसार, छोटू गोरख शिरसाट (रा. सातपूर कॉलनी) हा इसम घरगुती गॅस सिलिंडरमधून थेट वाहनांमध्ये अवैधरित्या भरत असल्याची माहिती पोलिसांना मिळाली. या ठिकाणी कोणतीही अधिकृत परवानगी अथवा सुरक्षिततेची साधने नसताना हे धोकादायक काम सुरू होते. अशाप्रकारे घरगुती गॅसचा व्यावसायिक वापर करणे बेकायदेशीर असून त्यामुळे मोठा स्फोट किंवा आग लागण्याचा धोका निर्माण होऊ शकतो. सातपूर पोलिसांना या प्रकरणाची गुप्त माहिती मिळाल्यानंतर तात्काळ पथक तयार करण्यात आले. काल दुपारी अचानक छापा टाकत घटनास्थळी सुरू असलेली गॅस भरण्याची प्रक्रिया थांबवण्यात आली. कारवाईदरम्यान सहा एलपीजी सिलिंडर, गॅस भरण्यासाठी वापरले जाणारे पाईप, वजन काटे, इलेक्ट्रिकल मोटर व इतर साहित्य जप्त करण्यात आले. ही कारवाई नाशिक शहर पोलीस आयुक्तांच्या आदेशानुसार, झोन २ चे पोलीस उपायुक्त यांच्या मार्गदर्शनाखाली वरिष्ठ पोलीस निरीक्षक प्रकाश आहिरे यांच्या नेतृत्वाखाली पार पडली. या मोहिमेत पोलीस हवालदार दीपक खरपडे, सागर गुंजाळ, अमोल मोरे आणि राहुल खांडबहाले यांनी सहभाग घेतला.

# नाशिक महानगरपालिकेत संत गाडगेबाबा जयंती



**नाशिक (भ्रमर प्रतिनिधी) :–** नाशिक महानगरपालिकेच्या वतीने संत गाडगेबाबा यांच्या जयंतीनिमित्त कार्यक्रम पार पडला.

मनपा मुख्यालय राजीव गांधी भवन येथील स्वागत कक्षाजवळ संत गाडगे बाबा यांच्या प्रतिमेस महापौर हिमगौरी आहेर-आडके, उपमहापौर विलास शिंदे यांच्या हस्ते पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले.

यावेळी शिवसेनेचे गटनेता अजय बोरस्ते, भाजपाचे गटनेता ॲड. श्याम बडोदे, बाळासाहेब निगळ, शहर अभियंता संजय अग्रवाल, उपआयुक्त अजित निकत, नितीन पवार, सुवर्णा दखणे, शिक्षणाधिकारी डॉ. मीता चौधरी, जनसंपर्क अधिकारी योगेश कमोद, सुरक्षा अधिकारी रमेश ताजमपुरे, नितीन गंभीरे, दीपक बंदरे आदींसह मनपातील अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.संत गाडगेबाबा हे महाराष्ट्रातील थोर समाजसुधारक, कीर्तनकार व स्वच्छता अभियानाचे प्रेरणास्थान होते. त्यांनी आयुष्यभर अंधश्रद्धा निर्मूलन, स्वच्छता, शिक्षण प्रसार, व्यसनमुक्ती आणि समाजप्रबोधन यासाठी कार्य केले. गावोगावी फिरून त्यांनी स्वच्छतेचे महत्त्व पटवून दिले व स्वत: हातात झाडू घेऊन स्वच्छतेचा संदेश दिला. समाजातील दुर्बल घटकांच्या उन्नतीसाठी त्यांनी धर्मशाळा, छात्रालये व शैक्षणिक संस्था उभारण्यात योगदान दिले. यावेळी उपस्थित मान्यवरांनी संत गाडगेबाबा यांच्या कार्याचा आदर्श घेत स्वच्छ, सुंदर व संस्कारी नाशिक घडविण्याचा संकल्प व्यक्त केला.

# शहरातून तीन मोटारसायकलींची चोरी

**नाशिक (भ्रमर प्रतिनिधी) :–** शहर परिसरात वाहनचोरीचे सत्र सुरू असून, वेगवेगळ्या ठिकाणांहून तीन मोटारसायकली अज्ञात चोरट्यांनी चोरून नेल्याप्रकरणी गुन्हे दाखल करण्यात आले आहेत.

वाहनचोरीचा पहिला प्रकार गंगापूर रोड येथे घडला. फिर्यादी आयुष तुषार कोठावदे (रा. पिंपळनेर (ता. साक्री, जि. धुळे) यांनी एमएच १८ सीए ०७३९ या क्रमांकाची दीड लाख रुपये किमतीची रॉयल एनफिल्ड बुलेट गंगापूर रोडवरील योग अपार्टमेंटच्या पार्किंगमध्ये उभी केली होती. ही मोटारसायकल दि. १४ ते २० फेब्रुवारीदरम्यान अज्ञात चोरट्याने चोरून नेली. या प्रकरणी सरकारवाडा पोलीस ठाण्यात अज्ञात चोरट्याविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला असून, पुढील तपास हिंगे करीत आहेत.

वाहनचोरीचा दुसरा प्रकार सिडकोत घडला. फिर्यादी दारासिंग हात्या पाडवी (रा. दत्तनगर, अंबड) यांनी राहत्या घराजवळ एमएच १५ जीजी ४७०९ या क्रमांकाची ५० हजार रुपये किमतीची होंडा कंपनीची शाईन मोटारसायकल पार्क केली होती. ही मोटारसायकल अज्ञात चोरट्याने मध्यरात्रीच्या सुमारास चोरून नेली. या प्रकरणी अंबड पोलीस ठाण्यात चोरीचा गुन्हा दाखल करण्यात आला असून, पुढील तपास पोलीस हवालदार चव्हाण करीत आहेत. वाहनचोरीचा तिसरा प्रकार संसरी गाव येथे घडला. फिर्यादी योगेश तुकाराम जाधव (रा. इच्छामणी निवास, संसरी गाव, ता. जि. नाशिक) यांनी राहत्या घराजवळ एमएच १५ ईव्ही १५५३ या क्रमांकाची ३५ हजार रुपये किमतीची बजाज पल्सर मोटारसायकल उभी केली होती. ही मोटारसायकल मध्यरात्रीच्या सुमारास अज्ञात चोरट्याने चोरून नेली. या प्रकरणी देवळाली कॅम्प पोलीस ठाण्यात चोरीचा गुन्हा दाखल करण्यात आला असून, पुढील तपास पोलीस हवालदार होलगिर करीत आहेत.

# लाल मिरचीचे उत्पादन कमी; दरात वाढ

**नाशिक (भ्रमर प्रतिनिधी) :–** यंदा लाल मिरचीचे उत्पादन कमी झाल्याने दर वाढले आहेत. सध्या एक किलोचा दर ५०० रुपये झाला आहे. गेल्या वर्षीच्या तुलनेत जास्त झालेला पाऊस, लांबलेला पावसाळा यामुळे यंदा लाल मिरचीचे उत्पादन कमी झाल्याचा अंदाज व्यापाऱ्यांनी व्यक्त केला. परिणामी गेल्या वर्षीच्या तुलनेत यंदा मिरचीच्या दरात सरासरी १५ ते २० टक्क्यांनी वाढ झाली आहे. इतर सुक्या मिरचीचे मुख्य आवक हंगामानुसार जानेवारी ते एप्रिल दरम्यान जास्त प्रमाणात सुरू होते. काही भागात काढणी थोडी लवकर किंवा उशीरा झाल्यास आवक मेपर्यंत होते. उन्हाळ्याच्या दिवसाता मसाले तयार करण्यात येतात. त्यामुळे या काळात लाल मिरचीला मोठ्या प्रमाणात मागणी असते.

# कौशिकी जोगळेकर यांना सूरकल्प कलाश्री पुरस्कार प्रदान

**नाशिक (भ्रमर प्रतिनिधी):–** अतिशय तरुण वयात विविधांगी गायकीने रसिकांना श्रवणानंद देणे ही अवघड बाब आहे. ती लिलया पेलणाऱ्या कौशिकी जोगळेकर या युवा गायिकेला यंदाचा सूरकल्प - कलाश्री पुरस्कार जाहीर झाला होता. टाळ्यांच्या कडकडाटात ज्येष्ठ गायक सूरमणी धनंजय जोशी यांच्या हस्ते तो प्रदान करण्यात आला. यावेळी आपल्या दमदार गायकीने तिने श्रोत्यांना मंत्रमुग्ध केले.



भारतरत्न पंडित भीमसेन जोशी यांच्या जयंतीनिमित्त त्यांच्या स्मृतींना वंदन करण्यासाठी येथील सूरकल्प फाउंडेशन आणि कलाश्री संगीत गुरुकुलाच्या वतीने स्वराधिराज संगीत संमेलनाचे आयोजन करण्यात आले. शंकराचार्य न्यासाच्या कुर्तकोटी सभागृहात कार्यक्रमाची सुरवात पं. भीमसेन जोशी यांच्या सरस्वती वंदनेने झाली. पं. अजय जोगळेकर यांच्या हस्ते दीपप्रज्वलन व प्रतिमापूजन करण्यात आले. कलाश्रीचे संचालक डॉ. आशिष रानडे यांनी प्रास्ताविक केले.

प्रमुख पाहुणे म्हणून अविराज तायडे, संजय मराठे, ओमप्रकाश रावत, नंदकिशोर भुतडा, विद्या पिंगळे, विराज लोमटे हे मान्यवर प्रमुख पाहुणे उपस्थित होते. संमेलनाची सुरूवात कौशिकी जोगळेकर यांच्या सुमधुर गायनाने करण्यात आली. त्यांनी भूप रागातील तिलवाडा तालात पारंपरीक बंदिशीने सुरूवात करून पुढे दृत लयीतील सादरीकरण केले व रसिकांची वाहवा मिळवली. शेवटी निर्गुणी भजन गायले. त्यांना तबल्यावर रोहित देव यांनी साथसंगत केली. त्यानंतर पुष्कर भागवत यांचे व्हायोलिन वादन झाले. त्यांनी झिंझोटी रागात विलंबित तीनताल मधे गत वाजवली. काफी रागातील गत वाजवून त्यांनी वेगळी अनुभूती दिली. संमेलनाचा समारोप पं. धनंजय जोशी यांच्या गायनाने झाला. त्यांनी बिहाग रागातील विलंबित एकतालातील बडा ख्याल व दृत तीनतालातील छोटा ख्याल यांचे सादरीकरण केले.

प्रसिद्ध भजनाने मैफिलीची सुरेल सांगता करून रसिकांना मंत्रमुग्ध केले. त्यांना तबल्यावर सौरभ क्षीरसागर, संवादिनीवर दिव्या रानडे तसेच तानपुऱ्यावर सौरीश कबीर आणि दीपक जाधव यांनी साथसंगत केली. अनुराधा मटकरी यांनी सूत्रसंचालन केले.

# दुचाकी वाहनांसाठी उद्यापासून आरटीओमध्ये नवीन मालिका

**नाशिक (भ्रमर प्रतिनिधी) :–** प्रादेशिक परिवहन कार्यालय, नाशिक येथे दुचाकी वाहनांसाठी (एमएच १५ के डब्ल्यू) ही नवीन मालिका उद्या (दि.२६) पासून सुरू करण्यात येत आहे, अशी माहिती सहाय्यक प्रादेशिक परिवहन अधिकारी महेश देशमुख यांनी दिली.

आकर्षक पसंतीच्या नोंदणी क्रमांकासाठीचे विहित नमुन्यातील अर्ज गुरूवारी सकाळी १०.३० ते २.३० वाजेपर्यंत या कार्यालयाच्या आवक-जावक कक्ष क्रमांक विभागात जमा करणे अनिवार्य राहील. एकदा राखून ठेवलेला पसंती क्रमांक कोणत्याही परिस्थितीत बदलून किंवा रद्द करता येणार नाही. राखून ठेवलेला पसंती क्रमांक कोणत्याही परिस्थितीत दुसऱ्या व्यक्ती, संस्थेच्या नावे हस्तांतरित होणार नाही. भरलेले शासकीय शुल्क कुठल्याही परिस्थितीत परत केले जाणार नाही. एकाच क्रमांकासाठी एकापेक्षा अधिक अर्ज आल्यास अशा आकर्षक क्रमांकांची यादी कार्यालयातील नोटीस बोर्डावर त्याच दिवशी प्रदर्शित करण्यात येईल. ज्या अर्जदारांचा आकर्षक क्रमांक लिलाव प्रक्रियेसाठी समाविष्ट असेल, अशा अर्जदारांनी लिलावात भाग घेण्यासाठी कार्यालयीन कामकाजाच्या दिवशी दुपारी ४ वाजेपर्यंत पसंतीच्या नोंदणी क्रमांकासाठी कोणत्याही बोलीच्या रकमेचा एकच डिमांड ड्राफ्ट बंद लिफाफ्यात सादर करावा.

# टवाळखोरांचा धुडगूस

**नाशिक (भ्रमर प्रतिनिधी):–** म्हसरूळ परिसरातील गुलमोहरनगर परिसरात काही दिवसांपासून टवाळखोरांनी उच्छांद मांडला आहे. रात्री मद्य आणि अंमली पदार्थांचे सेवन करून टोळक्यांकडून दहशत माजवली जात असल्याने येथील रहिवाशी धास्तावले आहेत. नशेत असलेल्या तरूणांकडून मोठ्याने ओरडणे, शिवीगाळ करणे असे प्रकार घडत आहेत.


महाराष्ट्र शासन
नाशिक त्र्यंबकेश्वर कुंभमेळा प्राधिकरण
जिल्हा परिषद भवन, जिल्हा परिषद नाशिक – 422101
दूरध्वनी क्र. 0253-2977374 Email-kumbhmela.2027@mah.gov.in

क्र. नात्रिंकुंप्रा/आस्था/जाहिरात/27/2026 दिनांक :- 24/02/2026

**जाहिरात**

महाराष्ट्र शासन नगरविकास विभाग, मंत्रालय, मुंबई यांचेकडील क्र. नामपा-2025/प्र. क्र. 24/नवि-25 दि. 10 ऑक्टोबर 2025 नुसार नाशिक-त्र्यंबकेश्वर कुंभमेळा प्राधिकरणा अंतर्गत पदांची निर्मिती करण्यात आली आहे. सदर शासन निर्णयातील प्रपत्र-अ मधील 5 (1) मध्ये गुणवत्ता व नियंत्रण साठी अधिक्षक अभियंता/कार्यकारी अभियंता हे एक पद निर्मित करण्यात आले आहे. तसेच सदर शासन निर्णयामध्ये सदरचे पदप्रतीनियुक्तीने, निवृत्त अधिकारी/कर्मचाऱ्यांमधून किंवा इतर मार्गाने आणि कंत्राटी पदे थेट जाहिरातीद्वारे किंवा मनुष्यबळ पुरवठा करणाऱ्या यंत्रणेमार्फत नियुक्त करण्याबाबत निर्देशित करण्यात आलेले आहे.

महाराष्ट्र शासन सामान्य प्रशासन विभाग, मंत्रालय, मुंबई यांचेकडील क्र. सीबीई 1525/प्र. क्र. 37/आस्थामं. (का-13) दि. 10 जून 2025 रोजीच्या शासन निर्णयान्वये शासकीय/निमशासकीय सेवानिवृत्त अधिकाऱ्यांच्या सेवा करार पद्धतीने विवक्षित कामासाठी घेण्याबाबत शासन निर्णयान्वये सदरील पदाकरिता पदभरती करण्यासाठी अर्ज मागविण्यात येत आहेत.

इतर महत्त्वाच्या सूचना -
1) इच्छुक उमेदवारांनी विहित नमुन्यातील अर्ज हस्तलिखित अथवा टंकलिखित करून पूर्णपणे भरलेला असावा, अपूर्ण अर्जाचा विचार केला जाणार नाही. अर्जावर अर्जदाराचा ईमेल आयडी व व्हॉट्सअॅप क्रमांक नोंदविण्यात यावा.
2) विहित नमुन्यातील अर्ज उपरोक्त नमूद पत्त्यावर **दिनांक - 02/03/2026 चा** अंतिम दिनांकापर्यंत पोहचतील अशा रितीने सादर करणे आवश्यक आहे. विहीत दिनांकानंतर पोस्टाद्वारे किंवा अन्य प्रकारे प्राप्त होणाऱ्या अर्जाची कोणतीही दखल घेतली जाणार नाही.
3) अर्जासोबत 22 से. मी. X 12 से. मी. आकाराचा स्वत:चे नाव व पत्त्यासह पोस्टाचे रुपये 5/- चे तिकीट लावलेला लिफाफा जोडावा.
4) अर्जाचा विहित नमुना नाशिक त्र्यंबकेश्वर कुंभमेळा प्राधिकरण कार्यालय, जुनी जिल्हा परिषद इमारत नाशिक येथे केवळ कार्यालयीन वेळेत दि. 28/02/2026 पर्यंत उपलब्ध आहेत.
5) महाराष्ट्र शासन सामान्य प्रशासन विभाग, मंत्रालय, मुंबई यांचेकडील क्र. सीबीई 1525/प्र. क्र. 37 /आस्थामं. (का-13) दि. 10 जून 2025 रोजीच्या शासन निर्णयात नमूद केलेनुसार देयक बाबत कारवाई केली जाईल.

पदाचा तपशिल - अधिक्षक अभियंता/कार्यकारी अभियंता (सेवा निवृत्त अभियंता संवर्ग)

| अ. क्र. | भरावयाच्या पदाचे पदनाम | भरावयाच्या पदाची संख्या | कामाचा कालावधी |
| --- | --- | --- | --- |
| 1 | अधिक्षक अभियंता/कार्यकारी अभियंता (सेनी) | 01 | नियुक्ती आदेशापासून सिंहस्थ कालावधी संपेपावेतो |

सदर पदासाठी नियुक्त करण्यात येणाऱ्या अधिकाऱ्यांसाठी उपरोक्त तक्त्यात नमूद शासन निर्णयातील अटी व शर्ती लागू राहतील.

**शेखर सिंह (भा.प्र.से.)**
कुंभमेळा आयुक्त तथा सदस्य सचिव
नाशिक त्र्यंबकेश्वर कुंभमेळा प्राधिकरण

विमाका/नाशिक/जाहिरात/४४५/२०२६